# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

प्रेसनोट

## दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी पीएमपीएमएल च्या काही बसमार्गांमध्ये बदल

दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती असल्यामुळे पीएमपीएमएलच्या काही बस मार्गांमध्ये दुपारनंतर बदल होण्याची शक्यता आहे.

सदर बाब विचारात घेता दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी बस मार्ग क्र. २, २अ, २ब, ३, ४, १०, ११, ११अ, ११क, १२, १३, १५, १७, २१, २६, ३०, ३७, ३८, ४१, ४२, ४७, ५०, ५२, ५२अ, ६०, ६४, ६४म, ६६, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७८, ८९, ९०, ९७, १०३, १११, ११७, ११८, ११८अ, १९९, २१६, २२७, २२७अ, २३१, २३२, २३३, २३३अ, २३३ब, २७९, २९४, २९५, २९७, २९८, २९९, ३३९, ३५४ व मेट्रो शटल १३ या मार्गांच्या बसेस जेधे चौक, सारसबाग या ठिकाणी रस्ता बंद झाल्यास सदरची वाहतूक दुपारपाळीमध्ये लक्ष्मी नारायण टॉकीज कडून डाव्या बाजूस वळवून मित्र मंडळ चौक, सारसबाग मार्गे संचलनात ठेवण्यात येणार आहे.

तसेच स्वारगेट येथील नटराज बस स्थानकाचा रस्ता बंद झाल्यास सदर बस स्थानकावरून सुटणाऱ्या बसेस खंडोबा मंदिर, पर्वती पायथा येथून सुटतील व रस्ता सुरू झाल्यानंतर नेहमीप्रमाणे नटराज बसस्थानकाहून बसेस सुटतील. तरी दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी पीएमपीएमएल च्या वरील बसमार्गांमध्ये होणाऱ्या बदलाची प्रवाशी नागरीकांनी नोंद घ्यावी व परिवहन महामंडळास सहकार्य करावे असे आवाहन पीएमपीएमएल कडून करण्यात येत आहे.

**Sd/-**

चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

दि. ३०/०७/२०२४

मा. संपादक,

दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

**Sd/-**

कामगार व जनता संपर्क अधिकारी

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---